Estd. 1962
NAAC "A" Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

सर्व अधिविभाग प्रमुख / विभागप्रमुख व वर्ग १ मधील सर्व प्रशासकीय अधिकारी यांना कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. सीएफआर १२१० / प्र.क्र.४७ / २०१० / तेरा, दि.१ नोव्हेंबर, २०११ नुसार परिशिष्ट-अ (१२) अन्वये **वार्षिक गोपनीय अहवाल लिहिताना आपल्या हाताखालील कर्मचाऱ्यांवर / अधिकाऱ्यांवर विशेषत: मागासवर्गीय अधिकाऱ्यांवर अन्याय होणार नाही याची काळजी प्रतिवेदन तसेच पुनर्विलोकन अधिकाऱ्यांनी घ्यावी. कर्मचाऱ्यांचे / अधिकाऱ्यांचे विशेषत: मागासवर्गीयांचे गोपनीय अहवाल त्यांच्या पदोन्नतीच्या सुमारास हेतुपुरस्सरपणे, नकारात्मकदृष्टया किंवा जाणूनबूजून प्रतिकूल स्वरूपात लिहिले जातात असे शासनाच्या निर्देशनास आले आहे. तरी गोपनीय अहवाल तसे न लिहिता ते अत्यंत वस्तुनिष्ठपणे लिहावेत. मागसवर्गियांचे गोपनीय अहवाल वस्तुनिष्ठपणे लिहिण्याबाबतच्या या सूचना अपंग कर्मचारी / अधिकारी यांचे गापेनीय अहवाल लिहिण्यासंदर्भात देखिल लागू राहतील. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्याविरूध्द योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. अशी तरतूद नमूद केलेली आहे.** सदरचा शासन निर्णय विद्यापीठ संकेतस्थळावर ठेवण्यात आला आहे.

सबब, उपरोक्त नमूद तरतूदीची नोंद घेवून वार्षिक गोपनीय अहवाल लिहिताना अधिविभाग प्रमुख / विभागप्रमुख व वर्ग १ मधील सर्व प्रशासकीय अधिकारी यांनी सदर शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबाजावणी करण्यात यावी.

कुलसचिव

जा.क्र. एसयुके/आस्थापना-२ / 1062 दिनांक :- 4 MAY 2019

प्रति,

१. सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक व सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा.कुलसचिव व समकक्ष अधिकारी
३. संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र
४. संचालक, विद्यार्थी कल्याण व राष्ट्रीय सेवा योजना
५. सर्व रेक्टर्स
६. इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळ INTRANET मध्ये GENERAL ADMINISTRATION-ESTABLISHMENT या मथळयाखाली ठेवण्यात यावे.

प्रत :- मा.कुलगुरू, मा.प्र-कुलगुरू, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय.